५९

**मंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्यासमोर मे/स्पॉन वेंन्चर्स यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४७ मधील तरतुदीनुसार शासनाकडे दाखल केलेल्या अपिल अर्जावरील आदेश.**

---

**अपिल नस्ती क्र. टिपीएस- १२१८/२१३६/प्र.क्र.८९/१८/नवि-१२**

मे/स्पॉन वेंन्चर्स :- अपिलार्थी

विरुध्द

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका :- प्रतिवादी

मे/स्पॉन वेंन्चर्स तर्फे वास्तुविशारद श्री.भरतकुमार पटेल यांनी मौजे-भाईंदर येथील स.क्र.२३७ (जुना स.क्र.६६३) क्षेत्र २२९५५.०० चौ.मी. या जागेवरील सुधारीत बांधकाम प्रस्ताव दि.२३/१/२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडे सादर केला असता सदर प्रस्ताव महानगरपालिकेने दि.२२/२/२०१८ च्या आदेशान्वये नामंजूर केला असून सदर कार्यवाहीने व्यथीत होऊन अपिलकर्त्याने मे/वाडीया गांधी ॲड कंपनीमार्फत त्याविरुध्द दि.२/४/२०१८ रोजीच्या अर्जान्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ च्या कलम ४७ अन्वये शासनाकडे अपिल दाखल केले आहे. सदर अपिल शासनास दि.३/४/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

०२. प्रस्तुत अपिल प्रकरणात यापुर्वी सर्व संबंधितांची सुनावणी आयोजित करण्यात आली असून अंतिम सुनावणी दि.१७/८/२०२० रोजी आयोजित करण्यात आली. सुनावणीचे वेळी खालीलप्रमाणे व्यक्ती /अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.गोपालजी के. द्विवेदी | - | अपिलार्थी |
| २) श्री.विजय चौधरी | - | उपसचिव, नगर विकास विभाग |
| ३) श्री.सुरेश निकुंभे | - | सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे |
| ४) श्री.दिलीप प्र. घेवारे | - | नगर रचनाकार, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| ५) श्री.समाधान खटकाळे | - | अवर सचिव, नगर विकास विभाग |
| ६) श्री.अशोक का. खांडेकर | - | कार्यासन अधिकारी (नवि-१२) |

सुनावणीचे वेळी सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले असून अपिलकर्त्यांनी त्यांचे म्हणणे खालीलप्रमाणे सादर केले.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

'True Copy'

Section Officer
Urban Development Deptt.
Mantralaya, Mumbai - 32.

०३. अपिलकर्त्याने मौजे-भाईंदर ता.जि.ठाणे येथील स.क्र.२३७ (जुना स.क्र.६६३) मधील २२९५५.०० चौ.मी. क्षेत्र सन-२०११ मध्ये खरेदी केले आहे. या जागेवर अपिलकर्त्यास सन-२०११ व २०१३ मध्ये बांधकाम परवानगी/सुधारीत बांधकाम परवानगी महानगरपालिकेने दिली आहे. या जमिनीसंदर्भात अतिरीक्त जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी ठाणे नागरी समुह यांनी दि.३०/११/२००० रोजी निर्गमित केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राबाबत श्री.मिलन गांधी यांनी प्रश्नाधिन जागेचे पुर्वीचे धारक श्री.शामसुंदर अग्रवाल यांचे विरुध्द तक्रार दाखल केली असून त्यानुषंगाने ठाणे शहर पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर क्र.२०१/२०१६ नोंद करण्यात आला आहे. सदर तक्रारीत अपिलकर्त्याचे नाव नमूद नाही. सदर तक्रारीच्या/एफआयआरच्या अनुषंगाने सहाय्यक पोलीस आयुक्त-गुन्हे शाखा ठाणे शहर यांनी दि.६/१/२०१७ च्या पत्राने प्रश्नाधिन जागेवर कोणतीही बांधकाम परवानगी/भोगवटा दाखला न देण्याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेला कळविले असून त्यानुसार सहाय्यक संचालक, नगर रचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि.२१/२/२०१८ च्या आदेशान्वये अपिलकर्त्याचा सुधारीत बांधकाम परवानगी प्रस्ताव नामंजूर केला आहे. महानगरपालिकेच्या दि.२१/२/२०१८ च्या आदेशाविरुध्द अपिलकर्त्याने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.३८१७/२०१८ दाखल केली असता मा.उच्च न्यायालयाने दि.२६ मार्च, २०१८ च्या आदेशान्वये याचिका निकाली काढून कलम-४७ खालील अपिल दाखल केले असल्यास ते ४ आठवड्यात निकाली काढणेबाबत निर्देश दिलेत. त्यानुसार अपिलकर्त्याने दि.२/४/२०१८ रोजी कलम-४७ खाली अपिल दाखल केले आहे.

'True Copy'

Section Officer
Urban Development Deptt.
Mantralaya, Mumbai - 32.

०४. त्यानंतर अपिलकर्त्याने दि.९/८/२०१८ रोजी शासनास पत्र देऊन त्यांच्या प्रश्नाधिन जमिनीची नागरी जमीन कमाल धारणा कायद्यांतर्गत कलम-२०/१०(३)/१०(५) अंतर्गत कार्यवाही झाली नसून उक्त जमीन नागरी जमीन कमाल धारणा कायद्याच्या तरतूदीपासून मुक्त असल्याचे कळविले. त्या अनुषंगाने शासन व जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा, ठाणे यांचेमध्ये काही पत्रव्यवहार होऊन सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा यांनी दि.५/११/२०१८ च्या पत्राने प्रश्नाधिन जमीनीला नागरी जमीन कमाल धारणा कायद्याच्या तरतुदी लागू होत नसल्याचे शासनास कळविले. सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल तसेच वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांचा दि.३/९/२०१२ चा अहवाल विचारात घेऊन शासनाने दि.३/१/२०१९ च्या पत्राने उक्त जमिनीला नागरी जमीन कमाल धारणा कायद्याच्या तरतूदी लागू होत नसल्याबाबत तसेच सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा यांचे दि.३०/११/२००० रोजीचे प्रमाणपत्र खोटे नसल्याचा

निष्कर्ष काढला आहे. त्या अनुषंगाने अपिलकर्त्याने दि.११/२/२०१८ व दि.५/७/२०१९ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे सुधारीत बांधकाम परवानगी मिळणेसाठी अर्ज केला आहे. तथापि महानगरपालिकेने त्यास प्रतिसाद न दिल्याने अपिलकर्त्याने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१०१०/२०२० दाखल केली असून त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.५/२/२०२० च्या आदेशान्वये कलम-४७ खालील अपील ४ आठवड्यात निकाली काढण्याचे निर्देश दिले आहेत.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता अपिलकर्त्याच्या दि.२१/१/२०१८ व दि.११/२/२०१९ रोजीच्या व इतर अर्जावर कार्यवाही करण्यास महानगरपालिकेला अडथळा नसून, पोलीस विभागाचे दि.६/१/२०१७ रोजीचे पत्र विचारात न घेता कलम-४७ खालील अपिल मान्य करुन महानगरपालिकेचे दि.२१/२/२०१८ चे आदेश रद्द करण्याची तसेच अपिलकर्त्याचा सुधारीत प्रस्ताव मंजूर करणेबाबत महानगरपालिकेला निदेश देण्याची विनंती अपिलकर्त्याने केली आहे.

०५. मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे खालीलप्रमाणे वस्तुस्थिती सुनावणीचे वेळी सादर करण्यात आली.

अपिलकर्त्याच्या प्रश्नाधिन जागेवर दि.३०/५/२०११ व दि.१०/१२/२०१३ रोजी बांधकाम परवानगी/सुधारीत बांधकाम परवानगी महानगरपालिकेतर्फे देण्यात आली असून सदर बांधकाम परवानगी नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम रद्द झाल्यानंतर देण्यात आली आहे. तथापि उक्त जागेबाबत नागरी जमीन कमाल धारणा कार्यालयाकडील दि.३०/११/२००० रोजीच्या ना-हरकत प्रमाणपत्रासंबंधात श्री.दिनानाथ गावडे व श्री.अशोक राऊत यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने नौपाडा (ठाणे) पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवून संबंधितांची चौकशी करण्यात आली आहे व सदर तक्रारीत तथ्य न आढळल्याने प्रकरण दफ्तरी दाखल करण्यात आले आहे. तसेच सदर बाबतीत गुन्हे शाखा, ठाणे शहर यांनी गुन्हा क्र.२०१/२०१६ नोंद करुन तपास केला आहे व न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. परंतू त्याबाबत महानगरपालिकेला कोणतेही आदेश/पत्र दिलेले नाही. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांचे दि.६/१/२०१७ च्या पत्राचे अनुषंगाने महानगरपालिकेने विकासकाचा सुधारीत बांधकाम प्रस्ताव दि.२१/२/२०१८ च्या आदेशान्वये नामंजूर केला आहे.

०६. उपसचिव व अवर सचिव नगर विकास विभाग (नागरी जमीन कमाल धारणा) हे सुनावणीचे वेळी उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, प्रश्नाधिन जागेबाबत

"True Copy"
Section Officer
Urban Development Deptt.
Mantralaya, Mumbai - 32.

जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांनी दि.५/११/२०१८ रोजी शासनास अहवाल सादर केला असून त्यानुषंगाने दि.३/१/२०१९ च्या पत्राने मिरा-भाईंदर महानगरपालिकेला कळविण्यात आले आहे. तथापि सदर प्रकरणी विकास परवानगी मिळत नसल्याने अपिलकर्त्याने मा.मंत्री महोदय नगर विकास विभाग यांचेकडे सादर केलेल्या दि.१३/६/२०२० च्या निवेदनावर मा.मंत्री महोदयांच्या निर्देशानुसार अपर मुख्य सचिव नगर विकास विभाग यांचेकडे दि.७/७/२०२० रोजी पोलीस आयुक्त, ठाणे यांचेसह सर्व संबंधितांची बैठक व्हिडीओ कॉन्फरसींग द्वारे आयोजित केली होती. त्यामध्ये निदर्शनास आलेल्या बाबी विचारात घेता, प्रश्नाधिन मौजे-भाईंदर ता.जि.ठाणे येथील जुना स.क्र.६६३ (नविन स.क्र.२३७) मधील क्षेत्राच्या विकास परवानगीसाठी पोलीस अहवाल/सुचना यांची आवश्यकता नाही.

उपरोक्त विवेचन विचारात घेता प्रकरणी विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

अपिलकर्त्याच्या प्रश्नाधिन जागेबाबत अतिरीक्त जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा, ठाणे यांनी दि.३०/११/२००० रोजी निर्गमित केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या अनुषंगाने ठाणे, गुन्हे शाखा येथील पोलीस स्टेशनमध्ये तक्रारकर्त्याने दाखल केलेली तक्रार व त्यानुसार गुन्हा नोंद क्र.२०१/२०१६ मध्ये सहाय्यक आयुक्त, गुन्हे शाखा पोलीस स्टेशन, ठाणे यांनी प्रश्नाधिन जागेवर कोणत्याही प्रकारची विकास परवानगी न देण्याबाबत आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना दि.६/१/२०१७ रोजी दिलेले पत्र विचारात घेऊन आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलकर्त्याची सुधारीत बांधकाम परवानगी नाकारली आहे. दि.३०/११/२००० रोजीच्या अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा यांचे प्रमाणपत्राबाबत शासनस्तरावर नागरी जमीन कमाल धारणा व सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयाकडून चौकशी करण्यात आली आहे. तसेच अपिलकर्त्याच्या निवेदनावर मा.मंत्री महोदयांचे निर्देशानुसार अपर मुख्य सचिव नगर विकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि.७/७/२००० रोजी पोलीस आयुक्त, ठाणे यांचेसह सर्व संबंधितांची बैठक होऊन प्रश्नाधिन जमिनीवर विकास परवानगी व इतर परवानग्या देण्यासाठी पोलीस अहवाल अथवा पत्र याची आवश्यकता नसल्याचा निष्कर्ष उक्त बैठकीत काढण्यात आला आहे. त्यानुसार सदर क्षेत्राच्या विकासाच्या अनुषंगाने बांधकाम प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, खरेदी-विक्री नोंदणी, फेरफार व इतर आवश्यक बाबींसाठी नियमानुसार परवानगी देण्याची

"True Copy"
Section Officer
Urban Development Deptt.
Mantralaya, Mumbai-32

कार्यवाही करणेबाबत नागरी जमीन कमाल धारणा विभागाकडून दि.९/९/२०२० च्या पत्राने आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिकेला कळविण्यात आले आहे.

प्रकरणाची वस्तुस्थिती, सुनावणीचे वेळी सर्व संबंधितांनी दाखल केलेले त्यांचे म्हणणे तसेच नगर विकास विभागाचे अभिप्राय विचारात घेता प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपिल अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२) सदर अपिल प्रकरणी पोलीस विभागाकडील अहवाल/अभिप्राय मागविण्याची आवश्यकता नाही. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी अपिलकर्त्याचे महानगरपालिकेकडे प्रलंबित सुधारीत बांधकाम प्रस्ताव, भोगवटा प्रमाणपत्र, खरेदी-विक्री नोंदणी, फेरफार व इतर आवश्यक बाबींसाठी नियमानुसार दोन आठवड्यात कार्यवाही करावी.

(एकनाथ शिंदे)
मंत्री, नगर विकास

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, ML ◦AI-32

**जा.क्र.टिपीएस-टिपीएस — १२१८/२१३६/प्र.क्र.८९/१८/नवि-१२**
**दिनांक :** 07/10/2020

'True Copy'

Section Officer
Urban Development Deptt.
Mantralaya, Mumbai - 32.